लोकमत

# अनुसूचित जातींतील गुणवंतांना दोन लाख

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** दहावीच्या परीक्षेत ९० टक्के वा त्याहून अधिक गुण प्राप्त केलेल्या अनुसूचित जातींमधील विद्यार्थ्यांना व्यावसायिक उच्चशिक्षणाची पूर्वतयारी करण्यासाठी अकरावी व बारावी अशा दोन वर्षात प्रतिवर्ष एक लाख याप्रमाणे एकूण दोन लाख रुपयांचे अनुदान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने 'बार्टी'मार्फत देण्यात येणार आहे. सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे यांनी ही घोषणा केली. मात्र, हा लाभ मिळविणाऱ्या

(पान १० वर)

Pune Main
Page No. 1 Jun 25, 2021

लोकमत

# अनुसूचित जातींतील गुणवंतांना दोन लाख

(पान १ वरून) विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न २.५ लाख रुपयांपेक्षा कमी असणे अनिवार्य राहील. एमएचसीईटी, जेईई, नीट यांसारख्या परीक्षांसाठी प्रोत्साहन म्हणून ही मदत दिली जाईल.

## शासकीय नोकरांच्या पाल्यांना योजना लागू नाही

शासकीय सेवेत नोकरीला असणाऱ्या पालकांच्या पाल्यांना ही योजना लागू असणार नाही. उत्पन्नाचा व जातीचा प्रमाणित दाखला देणे अनिवार्य असेल. विशेष म्हणजे, या योजनेमधील लाभार्थी संख्येवर कोणतीही मर्यादा नसेल, अशी माहिती बार्टीचे महासंचालक धम्मज्योती गजभिये यांनी दिली.